# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ : सीए/८५

दिनांक : १८/०१/२०१६

१) मा. प्राचार्य
सर्व संलग्नित अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये

२) मा. संचालक
सर्व मान्यताप्राप्त व्यवस्थापनशास्त्र संस्था

विषय : तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अखत्यारीतील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश व विद्यापीठाच्या संलग्नीकरणाच्या संदर्भात.

संदर्भ : संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१४/१०३५, दि. २० मे, २०१४

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहे की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली त्यासाठी मा. संचालक, तंत्र शिक्षण यांनी विद्यापीठाकडून सर्व संबंधित महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना विद्यापीठाच्या कोणत्याही अटीशिवाय प्राप्त झालेल्या संलग्नीकरणासंदर्भात माहिती मागविली होती. ज्या अभ्यासक्रमांना अटी व शर्तींच्या अधीन राहून संलग्नीकरणासंदर्भात मान्यता दिलेल्या होत्या अशा अटींच्या अधीन राहून दिलेल्या मान्यता तंत्र शिक्षण संचालनालय यांनी स्वीकारलेल्या नाहीत.

त्याप्रमाणेच शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठीच्या स्थानिक चौकशी समित्या लवकरच महाविद्यालयांना पाठविण्यात येतील. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी सर्व संबंधित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांनी संलग्नीकरणासंदर्भातील स्थानिक चौकशी समित्यांच्या भेटीचे लवकरात लवकर आयोजन करून तसेच अटी व शर्तींच्या अधीन राहून दिलेल्या अहवालातील आशयानुसार पडताळणी समितीचे भेटीचे आयोजन वेळेत करून सर्व अहवाल दि. १५ एप्रिल, २०१६ पूर्वी विद्यापीठास सादर करणे बंधनकारक आहे. विद्यापीठाकडून विनाअट संलग्नीकरणाची पत्रे प्राप्त करावयाची असल्यास स्थानिक चौकशी समित्यांच्या भेटींचे आयोजन वेळेत करून तसेच पडताळणी अहवाल वेळेत सादर करणे आवश्यक आहे. दि. १५ एप्रिल, २०१६ पूर्वी पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास व मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यापीठाकडून संलग्नतेसंदर्भातील अहवाल मागविल्यास फक्त विना अट संलग्नता प्राप्त करून घेणा-या महाविद्यालयांची व मान्यताप्राप्त संस्थांचीच माहिती तंत्रशिक्षण संचालनालयास कळविली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ